
LIVE महाराष्ट्र 24x7

www.livemaharashtra24x7.com

● संपादक : सचिन एस. अंभोरे

● रविवार, दि. १९ फेब्रुवारी २०२३ ● पाने ८

● खाजगी वितरणासाठी










राजा शिवछत्रपती

# दिल्लीचेही तख्त राखतो “महाराष्ट्र माझा”

## संपादकीय...

# ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार...

यंदाची ऐतिहासिक शिवजयंती आग्र्यात होत असल्याने एक वेगळा उत्साह समस्त शिवप्रेमींमध्ये आहे. अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठान चे विनोद पाटील यांनी या सर्व योग जुळवून आणल्याने यंदाची शिवजयंती ऐतिहासिक ठरत आहे. महाराष्ट्रातूनच नव्हे तर भारतातील विविध राज्यांमधून शिवप्रेमी आग्र्यामध्ये दाखल होत असल्याने छत्रपती शिवाजी महाराजांचा हा जन्मोत्सव कायम स्मरणात राहणारा ठरेल. १६६४ साली शिवाजी महाराजांनी व्यवसायीक केंद्र सुरत वर आक्रमणं करून त्याला नेस्तनाबूत केले यामुळे औरंगजेब प्रचंड चिडला. औरंगजेब राजा जयसिंग याला शिवरायांच्या खात्मा करण्यासाठी पाठवले. राजा जयसिंग दीडलाख सैन्यासोबत महाराजांवर चालून गेला मात्र या लढाईमध्ये महाराजांना हार पत्करावी लागली. त्यांना आपले २३ किल्ले आणि ४ लाख मुद्रा नुकसान भरपाई म्हणून द्यावी लागली. मिर्झाराजे जयसिंग यांच्याबरोबर झालेल्या तहानुसार इ.स १६६६ साली औरंगजेबाने शिवाजी राजांना दिल्लीयेथे भेटीसाठी बोलाविले. त्यानुसार शिवाजी महाराज औरंगजेबाच्या दरबारात वाढदिवसाच्या दिवशी पोहचले. त्यांच्यासोबत नऊ वर्षांचा राजपुत्र शंभूराजे देखील होते. तेथे पोहोचल्यानंतर महाराजांना मोगलांच्या दरबारी नजरकैदेत करण्यात आले. शिवाजी महाराज यांनी सुटकेचे केलेले प्रयत्न फोल ठरत होते. शेवटी शिवाजीराजांनी एक योजना आखली. मिठाईच्या पेटीत बसून त्यांनी आपली आणि बाळ संभाजीची सुटका करून घेतली आणिविजापुर मार्गे ते रायगडावर पोहोचले. पुढे महाराजांनी आपला बराच भाग मुघलांच्या ताब्यातून परत मिळवला. १६८१ ते १६८४ या काळात औरंगजेबाने शिवाजी महाराजांना परास्त करण्यात बरेच प्रयत्न केलेत पण तो पुर्णत: असफल ठरले. त्यामुळे ज्या आग्र्याच्या किल्यात जे काही घडले त्याच किल्यामध्ये यंदाची शिवजयंती होत असल्याने या सोहळ्याला एक वेगळे महत्व प्राप्त झाले आहे.

आग्र्यातील शिवजयंती मध्ये शिवरायांचे दर्शन घेऊन जाणाऱ्या प्रत्येकाला हा शिव जन्मोत्सव सोहळा प्रेरणादायी आणि उर्जा देणारा ठरणार असून महराष्ट्राच्याच नव्हे तर संपूर्ण भारताच्या या आराध्य दैवताचा सदैव अभिमान राहील. गेल्या अनेक वर्षापासून क्रांती चौकात नव्या पुतळ्याची प्रतिष्ठापना व्हावी आणि प्रत्येकाला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे दर्शन घ्यावे याची प्रतीक्षा लागलेली होती. शेवटी आज तो सोनेरी क्षण उजाडला असून छत्रपती शिवाजी महाराज की जय.... या शिवगर्जनेने संपूर्ण क्रांती चौक परिसर आज दुमदुमून गेला आहे. शहरातील सर्वांत मोठ्या आकर्षणापैकी एक असलेला छत्रपती शिवाजी महाराज यांचा हा अश्वारूढ पुतळा असून प्रत्येकाला प्रेरणा आणि उर्जादेणारा आहे. ऐतिहासिक औरंगाबादशहरात आता शिवस्मारकामुळे एक नवा इतिहास निर्माण झाल्याने भविष्यात या सोनेरी क्षणांची प्रत्येकाच्या मनात एक वेगळी आठवण ही कायम राहील.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक असलेल्या शिवाजी महाराजांचे स्मारक म्हणजे प्रत्येक शहरातलं एक धगधगतं ठिकाण असतं. छत्रपती संभाजी नगर, क्रांतीचौकातील शिवाजी महाराजांचा पुतळा हा देखील शहराच्या जडणघडणीतल्या प्रत्येक स्थित्यंतराचा साक्षीदार ठरला. शिवाजी महाराज हे सर्वधर्मसमभावाचे तत्त्व पाळणारे होते. त्यामुळे भावी पिढीला त्यांचा आदर्श रहावा, या उद्देशाने पुतळा क्रांतिचौकात विराजमान करण्यात आला आहे. पुढच्या पिढी साठी हा ऐतिहासिक क्षण एक नवा विचार निर्माण करणारा असून शिवरायांचा आठवावा प्रताप असेच या ऐतिहासिक क्षणामुळे म्हणावे लागेल... आपण सर्व या ऐतिहासिक क्षणांचे साक्षीदार आहोत याचा प्रत्येकाला शिवरायांच्या चरणी नतमस्तक होतांना शेवटच्या श्वासापर्यंत अभिमानच वाटत राहील...या अविस्मरणीय, दैदिप्यमान ऐतिहासिक शिवजन्मोत्सवाच्या प्रत्येक शिवप्रेमींना लाईव्ह महराष्ट्र 24x7 च्यावतीने मनस्वी शुभेच्छा....जय जिजाऊ...! जय शिवशंभू ...!!!





मराठवाड्यातील छत्रपतींचा पहिला अश्वारूढ पुतळा
(पान ३ वर)







# पुतळा बसविण्याच्या मागणीला यश...

१९९० च्या दशकात औरंगाबादचे मोठ्या प्रमाणात औद्योगिकीकरण झाले. त्यामुळे लोकसंख्या वाढली आणि शहराचा विस्तारही झाला. क्रांतीचौकात सतत वाहतूक कोंडी होऊ लागली. दरम्यानच्या काळात क्रांती चौकातील छत्रपतींच्या पुतळ्याच्या आवारात मोठ्या प्रमाणात सुशोभीकरण करण्यात आले होते. हा पुतळा मराठवाड्यातील एक आकर्षण होता. दरम्यान, वाढलेल्या गर्दीमुळे २०१२ मध्ये क्रांती चौकात उड्डाणपुल बांधण्यात आला. पुतळ्याच्या दोन्ही बाजूंनी वैशिष्ट्यपूर्ण असा उड्डाणपूल बांधला मात्र, यामुळे पुतळा झाकोळला गेला. ही बाब शिवप्रेमींना खटकत होती. त्यामुळे यापेक्षा उंच पुतळा बसविण्याची मागणी विनोद पाटील, अभिजित देशमुख राजू शिंदे, राजेंद्र जंजाळ यांनी महानगर पालिकेच्या सभागृहात केली.

शिवप्रेमींनी याबाबत अनेक आंदोलने तसेच सातत्याने पाठपुरावाही केला. अखेर मनपाने २०१८ मध्ये क्रांती चौकात सांगणारी पुलापेक्षा उंच असा भव्य पुतळा उभारण्याचा निर्णय घेतला.

तब्बल चार वर्षांनंतर अखेर क्रांती चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा देशातील सर्वांत उंच अशा अश्वारूढ पुतळ्याची उभारणी पूर्ण झाली. दि. १८ फेब्रुवारी २०२२ रोजी या पुतळ्याचे अनावरण रात्री करण्यात आले.

### असे आहे क्रांती चौकातील नवे शिवस्मारक....

- ३.५ कोटीतून पुतळा व सौंदर्यकरन
- पुतळ्याची एकूण उंची ५२ फुट
- शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याची उंची २१ फुट
- चौथऱ्याची उंची ३१ फुट
- ०७ मे.टन पुतळ्याचे वजन
- ९८ लाख पुतळ्यावरील खर्च
- २.५५ कोटी चौथऱ्याचा खर्च...
- ३.५३ कोटी अंदाजपत्रकीय खर्च

# उपोषणामुळे साकारले क्रांती चौकात भव्य शिव स्मारक...

**लाईव्ह महराष्ट्र न्यूज नेटवर्क | दि. १९** छत्रपती संभाजी नगर येथील क्रांती चौकात असलेल्या सर्वात उंच अशा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकासाठी दिनांक २० सप्टेंबर २०१६ रोजी ठराव घेण्यात आला होता यासाठी माजी उपमहापौर राजू शिंदे यांनी हा मुद्दा सभेमध्ये लावून धरला होता. प्रशासनाला कोंडीत पकडण्यासाठी माजी नगरसेवक अभिजित देशमुख, विनोद पाटील, विश्वनाथ स्वामी, प्रकाश मते तसेच अन्य पदाधिकाऱ्यांनी उपोषण केले होते. त्यांच्या उपोषणाला यश आल्याने आज क्रांती चौकात सर्वात उंच असे छत्रपती शिवाजी महाराजांचे देखणे स्मारक येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी प्रेरणा व उर्जा देणारे ठरले आहे.

# ‘जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा’ असणार महाराष्ट्राचे राज्यगीत

## सांस्कृतिक कार्य विभागाच्या प्रस्तावाला मंत्रीमंडळाची मान्यता

**मुंबई : ( लाईव्ह महराष्ट्र न्यूज नेटवर्क ) :**

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना महाराष्ट्र राज्याचे राज्यगीत म्हणून “जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा” हे कविवर्य राजा निळकंठ बढे यांच्या गीतामधील दोन चरणाचे गीत “महाराष्ट्राचे राज्यगीत” म्हणून घोषित करण्यात आल्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी सांगीतले . मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या राज्य मंत्रिमंडळ बैठकीत एकमताने या गीतास राज्यगीत म्हणून मान्यता देण्यात आली आहे .

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर आतापर्यंत अधिकृत असे राज्यगीत नव्हते . भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून महाराष्ट्रातील सर्व नागरिकांना स्फुर्तीदायक व प्रेरणादेणारे तसेच महाराष्ट्राचे शौर्याचे वर्णन करणारे महाराष्ट्र गीत म्हणून स्वीकारण्यात आले आहे . जय जय महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा याचे गीतकार कविवर्य राजा निळकंठ बढे, संगीतकार श्रीनिवास खळे असून हे गाणं शाहीर कृष्णराव साबळे यांनी गायले आहे .

छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून महाराष्ट्र गीत येत्या दि . १९ फेब्रुवारी २०२३ पासून महाराष्ट्राचे राज्यगीत म्हणून स्वीकारण्यात येणार आहे . हे राज्यगीत सुमारे १ मिनिट ४१ सेकंद गायिले किंवा पोलीस बँडवरती वाजविले जाईल .

“जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा”

जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा” जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ||धृ||
भिती न आम्हा तुझी मुळी ही गडगडणाऱ्या नभा
अस्मानाच्या सुलतानीला जबाब देती जिभा
सह्याद्रीचा सिंह गर्जतो शिव शंभू राजा
दरीदरीतून नाद गुंजला महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा ॥१ ॥
काळ्या छातीवरी कोरली अभिमानाची लेणी
पोलादी मनगटे खेळती, खेळ जीव घेणी
दारिद्रयाच्या उन्हात शिजला
निढळाच्या घामाने भिजला
देश गौरवासाठी झिजला
दिल्लीचे ही तख्त राखितो, महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा, गर्जा महाराष्ट्र माझा
जय जय महाराष्ट्र माझा ॥२ ॥



महाराष्ट्र राज्यगीत गायन, वादन संदर्भातील काही मार्गदर्शक सूचना असणार आहेत . त्या पुढीलप्रमाणे :-

१ ) शासनाच्या सर्व सार्वजनिक कार्यक्रमात सुरुवातीस राज्यगीताचे गायन वादन हे ध्वनीमुद्रीत आवृत्तीसोबत अथवा स्वतंत्रपणे करण्यात यावे . २ ) १ मे महाराष्ट्र दिनी ध्वजारोहणानंतर राष्ट्रगीत होताच राज्यगीत वाजविले / गायले जाईल . 3 ) राज्यातील शाळांमध्ये दैनिक सत्र सुरु होण्यापूर्वी, परिपाठ / प्रतिज्ञा / प्रार्थना / राष्ट्रगीत यासोबत राज्यगीत वाजविले/गायले जाईल . 4 ) राज्यातील सर्व शैक्षणिक संस्था, सर्व प्रकारच्या अशासकीय संस्था, स्वयंसेवी संस्था, खाजगी आस्थापना तसेच सर्व नागरीकांना सांस्कृतिक, सामाजिक आणि क्रीडाविषयक कार्यक्रम इत्यादी मध्ये राज्यगीताचा योग्य तो सन्मान राखून ते वाजविण्यास / गाण्यास मुभा राहील . 5 ) राज्यगीत सुरु असतांना सर्वांनी सावधान स्थितीत उभे राहावे व राज्य गीताचा सन्मान करावा . लहान बालके, गरोदर स्त्रिया, आजारी व्यक्ती, दिव्यांग व्यक्ती तसेच वृध्द व्यक्ती यांना सावधान उभे राहण्यापासून सूट असेल . 6 ) राष्ट्रगीताबाबतीत जसे तारतम्य बाळगण्यात येते तसेच ते राज्यगीताच्या बाबतीत सुध्दा बाळगण्यात यावे . हे गीत वाजवितांना/ गातांना त्याचा योग्य तो सन्मान राखण्यात यावा . 7 ) वाद्यसंगीतावर आधारीत या गीताची वाद्यधून पोलीस बॅडमार्फत वाजविता येईल . 8 ) राज्य शालेय शिक्षण मंडळाच्या पाठ्यपुस्तकांमध्ये या राज्यगीताचा समावेश पुढील शैक्षणिक वर्षापासून करण्यात यावा . 9 ) या राज्यगीताच्या प्रभावी प्रचार व प्रसिध्दीसाठी सर्व विभागांनी आपल्या अधिनस्त आस्थापनांस / कार्यालयांस सूचना द्याव्यात . 10 ) माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडून राज्यगीताचा प्रचार / प्रसार करण्यासाठी विशेष मोहिम आखण्यात यावी . त्यासाठी मुद्रित माध्यमे, इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे तसेच समाज माध्यमांचाही सुयोग्य वापर करण्यात यावा .

11 ) या अधिकृत राज्यगीताची लिंक राज्य शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध राहील .

LIVE महाराष्ट्र 24x7
●विशेषांक लेखन, संपादन
●सचिन एस .अंभोरे
शब्दांकन व वृत्तसंकलन
●भास्कर निकाळजे
●सचिन ठोकळ
●संदीप तांगडे
●भानुदास मते
●सिद्धेश्वर थोर
●गणेश पुजारी
●शुभम पगारे
●नितीन अंभोरे
सर्व छायाचित्रे
●कृष्णा लोखंडे पाटील
●अमोल वाघुले
●अभिजित गवई
●आकाश ठोकळ
●मांडणी व सजावट
●महेश बीडकर




## मराठवाड्यातील छत्रपतींचा पहिला अश्वारूढ पुतळा

(२१ मे १९८३)

● औरंगाबादेत १९७० साली शिवजयंती महोत्सव समितीची स्थापना झाली . त्यावेळी जिल्ह्यात शिवरायांचा एकही पुतळा नव्हता . शिवजयंती महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष पृथ्वीराजभाऊ पवार शिवप्रेमींनी छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी तत्कालीन नगरपरिषद, जिल्हा परिषदेकडे पाठपुरावा सुरु केला . अखेर १९८३ साली त्यांच्या पाठपुराव्याला यश आले .

● शहराचे हृदयस्थान असलेल्या क्रांती चौकात छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा साकारण्यात आला . तत्कालीन मुख्यमंत्री स्व . वसंतदादा पाटील यांच्या यांच्या हस्ते शिवरायांच्या पुतळ्याचे २१ मे १९८३ रोजी मोठ्या थाटामाटात अनावरण करण्यात आले . या वेळेस तत्कालीन मंत्री बाबूरावजी काळे, लोकनेते बाळासाहेब पवार, तत्कालीन मंत्री अब्दुल अजीम, तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष स्व . साहेबराव पा .डोणगावकर, तत्कालीन नगर परिषद अध्यक्ष अलफ खान आदींनी मोलाचे सहकार्य केले होते . हा मराठवाड्यातील छत्रपतींचा पहिला अश्वारूढ पुतळा होता .

LIVE महाराष्ट्र 24x7



# राजा शिवछत्रपती



प्रौढ प्रताप पुरंदर . . .
क्षत्रीय कुलावंतस् . . .
सिंहासनाधिश्वर . . . .
महाराजाधिराज . . . .
श्री छत्रपती शिवाजी महाराज !!!

शिवाजी हे नाव घेताच डोळ्यासमोर येते ते दणकट शरीर, बुद्धिमान, शौर्य व धैर्याची मूर्ती एक महान देशभक्त आणि कुशल प्रशासक . त्यांचे पुर्ण नाव शिवाजी शहाजी भोसले . मराठी साम्राज्याचे संस्थापक उत्कृष्ट योद्धा, आदर्श शासनकर्ता , सर्वसमावेशक, सहिष्णू राजा म्हणून भारतीय आणि विशेषत्वाने महाराष्ट्रीय इतिहासावर महत्वपूर्ण ठसा उमटवला . शिवाजी महाराज हे स्वत : धर्मनिष्ठ हिंदू राजे होते .

## शिवाजी महाराजांचे प्रारंभिक जीवन

अशाच महान राजाचा जन्म १९ फेब्रुवारी १९३० मध्ये शिवनेरी किल्ल्यावर झाला . महाराष्ट्रातील मराठा राज्याचे संस्थापक आणि पहिले अभिषिक्त छत्रपती . त्यांचा जन्म मराठवाड्यातील भोसले या वतनदार घराण्यातील मालोजींचे पुत्र शहाजी आणि सिंदखेडकर जाधव यांच्या कन्या जिजाबाई यांच्या पोटी शिवनेरी किल्ल्यावर झाला .

शिवाई देवीच्या नावावरून महाराजांचे “शिवाजी” असे नामकरण करण्यात आले . महाराजांना राज्यशासनाचे आणि युध्द कौशल्याचे धडे राजमाता जिजाऊंकडुन मिळाले . लहानपणापासून राम आणि श्रीकृष्णाच्या कथा ऐकून अन्याय आणि अत्याचार करणाऱ्यांविरुद्ध त्यांच्या मनात चीड निर्माण झाली .

पहिली गुरु आई आणि दुसरे गुरु दादोजी कोंडदेव यांच्या सान्निध्यात आणि संस्कारात महाराजांचे बालपण अतिशय उत्तम रितीने गेले . दादोजींनी त्यांना युध्द कौशल्यात आणि नितिशास्रात पारंगत केले . जिजाबाई महाराजांना राम कृष्णाच्या, श्रीरामाच्या आणि शूरवीरांच्या गोष्टी सांगत त्यांच्यावर उत्तम संस्कार तर करतच होत्या त्या शिवाय तलवारबाजी, घोडेस्वारी करणे त्यात त्यांना तरबेज करत होत्या .

शिवाजी महाराज यांच्या यशस्वी वाटचालीत आई जिजाऊचे मोलाचे श्रेय असून प्रत्येक महत्त्वाच्या प्रसंगी त्यांना जिजाबाईंनी खंबीर मार्गदर्शन केले . मुघल साम्राज्य आपल्यावर करत असलेल्या अन्यायाची जाणीव त्यांना झाली . आणि या अत्याचारातून आपल्या जनतेला मुक्त करण्याचा वसा त्यांनी उचलला .

त्यांच्या हृदयात स्वराज्य स्थापन करण्याची एक ज्योत प्रज्वलित झाली होती . त्यांना स्वतत्र राज्य निर्माण करायचे होते . आपल्या राज्यासाठी स्वातंत्र्य मिळवून द्यायचे होते . त्याच वेळी महाराजांना काही धाडसी आणि खऱ्या मित्रांची सोबत लाभली ज्यांनी महाराजांना स्वराज्य निर्माण करण्यामध्ये मदत केली .

## स्वराज्य स्थापनेची ओढ

महाराज लहानाचे मोठे शिवनेरीत येथे झाले . शिवनेरी सोबतची माहुली व पुणे येथे देखील त्यांचे बालपण गेले . शहाजी महाराजांनी शिवाजी आणि जिजाबाई यांच्या हाती संपूर्ण महाराष्ट्राच्या जहागिरीची व्यवस्था सोपविली अणि त्यांना पुण्यात पाठविण्यात आले . जहागिरीची व्यवस्थापन स्वत दादाजी कोंडदेव आणि काही विश्वासू सरदार बघायचे .

जिजामाता सारखाच शिवाजी महाराजांमध्ये कणखरपणा, देशासाठी असलेले प्रेम आणि कठीण प्रसंगातून बाहेर येण्याचे ध्येय होते . अशा गुणांमुळे शिवाजी तयार झाले . “स्वराज्य म्हणजे स्वताचे राज्य .” महाराजांना वाटू लागले जर आपल्याला आपल्या स्वराज्याचे रक्षण करायचे असेल तर त्यासाठी गड किल्ले आपल्या ताब्यात असले पाहिजे . ही जाणीव त्यांना लहानपणापासून होती .

दादोजी कोंडदेव यांच्या निधनानंतर आता सर्व महाराष्ट्राची जबाबदारी शिवाजी महाराजांवर आली होती . त्यांनी हळूहळू सर्व गड किल्ले ताब्यात घेण्यासाठी अनेक मोहिमा आखून त्या यशस्वीरित्या पार पाडल्या . आपल्या वयाचे धाडसी असे युवा त्यांनी जमवले . सुरवातीला महाराजांनी पुणे जिल्ह्यातील काही पडके किल्ले टेकड्या ताब्यात घेण्यास सुरुवात केली .

## तोरणा किल्ला

तोरणा किल्ला हा महाराजांचा पहिला गड होता जो त्यांनी हस्तगत केला होता . त्यानंतर राजगड आणि हळूहळू असे ३६० किल्ले त्यांनी आपल्या ताब्यात घेतले . त्यांच्यासोबत त्यावेळी तानाजी मालुसरे, नेताजी पालकर, येसाजी कंक, बाजीप्रभू देशपांडे, बाजी पासलकर, कान्होजी जेधे अशी महान व्यक्तिमत्वे होते .

## स्वराजाची शपथ

रायरेश्वर किल्ल्यावर शिवशंभुच्या मंदिरात २६ एप्रिल १६४५ साली फक्त वयाच्या सोळाव्या वर्षी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची शपथ घेतली . स्वराज्याचे तोरण बांधताच त्यांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले . महाराजांनी धाडसी तरुणांचा समुह बनवला ज्याला त्यांनी “ मावळा” असे नाव दिले . ह्याच मावळ्यांच्या साथीने त्यांच्यामध्ये धर्मप्रेम निर्माण करून त्यांना लढाईचे प्रशिक्षण दिले आणि स्वराज्याची संकल्पना सांगितली . हिंदवी स्वराज्यासाठी मावळ्यांनी त्यांच्या रक्ताचे पाणी केले . त्यांनी विजापूर आणि दिल्ली या राजसत्तांना आपल्यासमोर झुकायला लावले .

## शिवाजी महाराजांचा विवाह

शिवाजी महाराजांचा विवाह १४ मे १६४० मध्ये सईबाई निंबाळकर यांच्यासोबत लाल महाल पुणे येथे संपन्न झाला . महाराजांनी वैयक्तिक राजनीति चालू ठेवण्यासाठी एकूण आठ लग्न केली . मराठा सरदारांना एका छत्राखाली आणण्यात महाराज यशस्वी झाले . महाराजांनी प्रथम विवाह सईबाई यांच्या सोबत केला . त्यानंतर सोयराबाई मोहिते, पुतळाबाई पालकर, सकवारबाई गायकवाड, काशिबाई जाधव व सगुणाबाई शिंदे यांच्याशी त्यांचा विवाह झाला . याशिवाय गुणवंतीबाई इंगळे आणि लक्ष्मीबाई विचारे यांच्याशीही त्यांचा विवाह झाला . सईबाई पासून संभाजी ( १६५७ ते १६८९ ) व सोयराबाई पासून राजाराम ( १६७० ते १७०० ) असे दोन मुले झाले . त्याशिवाय शिवाजी महाराजांना काही कन्या पण होत्या . १६५९ मध्ये सईबाईचे निधन झाले . पुतळाबाई महाराजांसोबत सती गेल्या .

## पावनखिंड युद्ध

अफजलखानच्या मृत्यूनंतर आदिलशाह चिडला आणि त्याने सिद्धि जौहर ला सैन्यासोबत शिवाजी महाराजांचा नाश करण्यासाठी पाठवले . सिद्धि जौहर ने पन्हाळगड ला चौफेर वेढा घातला . त्या वेढ्यातून सिद्धीला तुरी देत राजे सैनिकांसह विशालगडाकडे रवाना झाले . शिवाजी महाराजांचा पाठलाग करत सिद्धीच्या सैन्याने त्यांना घोडखिंडीत त्यांना गाठले आणि लढाई शुरू झाली . तेव्हा शिवाजी महाराजांचे विश्वासू सरदार बाजीप्रभू देशपांडे यांनी शिवाजी राजांना तेथून जाण्याची विनंती केली .

“लाख मेले तरी चालतील परंतु लाखाचा पोशिंदा जगला पाहिजे” म्हणुन शिवाजी महाराजांना बाजीप्रभू देशपांडे यांनी शिवाजी राजांना विशालगडाकडे कूच करायची विनंती केली . बाजीप्रभू देशपांडे यांनी आपल्या शौर्याची सीमा गाठत सिद्धि च्या सैन्याला रोखून धरले . संख्येने अधिक असलेल्या सैन्याला बाजीप्रभू आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी आपली प्राणाची बाजी लावत झुलवत ठेवले .

शिवाजी महाराज गडावर पोहोचल्याचा संदेश समजल्यावर बाजीप्रभू देशपांडे यांनी आपले प्राण सोडले . शिवाजी महाराजांनी असे साथीदार तयार करून स्वराज्य स्थापन केले अणि त्याच्या वाढीसाठी अशा अनेक सरदारांनी आपल्या राजासाठी प्राणाची आहुती दिली . शिवाजी महाराजांनी घोडखिंडीचे नाव “पावनखिंड” असे बदलून बाजीप्रभू देशपांडे यांच्या बलिदानाची आठवण जागवत ठेवली .

## अफजल खानाचा वध

● आदिलशहाच्या ताब्यात असणारे किल्ले जिंकत राहिल्यामुळे मुघल, निजाम, आदिलशाही मध्ये हाहाकार माजला होता . इ .स . १६५९ साली आदिलशाहाने दरबारात त्याच्या सैनिकांना आव्हान दिले की तुमच्यातल्या कोणीतरी एकाने मला शिवाजीला मारून दाखवा . तेवढ्यात त्यांच्या दरबारी असलेला धीट अफजलखान हा समोर येऊन त्याने शिवाजी महाराजांना संपवायचा विडा उचलला .

शिवाजी महाराजांवर आक्रमक करण्यासाठी अफजलखान विजापूर वरुन १०००० सैन्य घेऊन निघाला . अफजलखान धाडधिप्पाड शरीरयष्टीचा होता . शिवाजी महाराजांना डिवचण्यासाठी त्याने रस्त्यात अनेक मंदिरे उध्वस्त केली, अनेक निरपराध लोकांचा बळी घेतला . शिवाजी महाराजांनी त्याला प्रतापगडावर तोंड देण्यास ठरविले . तहाची बोलणी सुरू झाली आणि अंतिम बोलणीसाठी शिवाजी महाराजांनी स्वता : यावे असा अफजलखानचा आग्रह होता .

शिवाजी महाराजांना अफजलखानच्या दगाबाजीची कल्पना असल्यामुळे त्यांनी सावधानी म्हणून चिलखत चढवले अणि सोबत बिचवा अणि वाघानखे ठेवली . अफजलखानने शिवाजी महाराजांना मारून टाकायचे या इराद्याने भेटीचे निमंत्रण पाठवले होते . प्रतापगडाच्या पायथ्याशी आलिशान शामियान्यात भेट ठरली . शिवाजी महाराजांसोबत तेव्हा जिवा महाल हे विश्वासू सरदार होते आणि अफजलखान सोबत सय्याद बंडा हे तत्कालीन प्रख्यात असे दांडपट्टेबाज होते . धाडधिप्पाड अफजलखानाने शिवाजी महाराजांना मिठी मारली आणि शिवाजी महाराजांचे प्राण कंठाशी आले . त्याच वेळी अफजलखान याने काट्यारिचा वार शिवाजी महाराजांवर केला परंतु चिलखतामुळे शिवाजी महाराज बचावले .

अफजलखानचा दगा पाहून शिवाजी महाराजांनी वाघनखे खानाच्या पोटात खुपसली . त्याचबरोबर अफजलखानची प्राणांतिक आरोळी सगळीकडे पसरली . सय्यद बंडाने तत्क्षणी शिवाजीवर दांडपट्टायाचा वार केला जो लगेच जिवा महालाने स्वत :वर घेतला आणि शिवाजी महाराजांचे प्राण वाचवले . तेव्हापासून “होता जिवा म्हणून वाचला शिवा” ही म्हण प्रचलित झाली . आणि त्याचवेळी महाराजांपेक्षा दुप्पट असा अफजलखान जमिनीवर कोसळला . शिवाजी महाराजांनी अफजलखानच्या मृत्यूनंतर त्याच्या शवाचे अंत्यसंस्कार इस्लाम मधील पद्धतीने करून त्याची एक कबर प्रतापगडावर बांधली .

## आग्र्याची गोष्ट:

● इस . १६६४ साली शिवाजी महाराजांनी व्यवसायीक केंद्र सुरत वर आक्रमणं करून त्याला नेस्तनाबूत केले यामुळे औरंगजेब प्रचंड चिडला . औरंगजेब राजा जयसिंग याला शिवरायांच्या खात्मा करण्यासाठी पाठवले . राजा जयसिंग दीडलाख सैन्यासोबत महाराजांवर चालून गेला मात्र या लढाईमध्ये महाराजांना हार पत्करावी लागली . त्यांना आपले २३ किल्ले आणि ४ लाख मुद्रा नुकसान भरपाई म्हणून द्यावी लागली .

मिर्झाराजे जयसिंग यांच्याबरोबर झालेल्या तहानुसार इ .स १६६६ साली औरंगजेबाने शिवाजी राजांना दिल्ली येथे भेटीसाठी बोलाविले . त्यानुसार शिवाजी महाराज औरंगजेबाच्या दरबारात वाढदिवसाच्या दिवशी पोहचले . त्यांच्यासोबत नऊ वर्षांचा राजपुत्र शंभूराजे देखील होते . तेथे पोहोचल्यानंतर महाराजांना मोगलांच्या दरबारी नजरकैदेत करण्यात आले . शिवाजी महाराज यांनी सुटकेचे केलेले प्रयत्न फोल ठरत होते . शेवटी शिवाजीराजांनी एक योजना आखली . मिठाईच्या पेटीत बसून त्यांनी आपली आणि बाळ संभाजीची सुटका करून घेतली आणि विजापुर मार्गे ते रायगडावर पोहोचले . पुढे महाराजांनी आपला बराच भाग मुघलांच्या ताब्यातून परत मिळवला . १६८१ ते १६८४ या काळात औरंगजेबाने शिवाजी महाराजांना परास्त करण्यात बरेच प्रयत्न केलेत पण तो पुर्णत : असफल ठरले .

## शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक आणि सिंहासन

● अखेर तो दिवस उजडला ज्याची सर्वजण आतुरतेने वाट पाहत होते . ६ जून १६७४ ला गागाभट्ट यांनी हिंदू परंपरेनुसार अनेक ज्येष्ठांच्या अणि श्रेष्ठांच्या उपस्थितीने शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक केला . त्यांनी शिवराई हे चलन शुरू केले . संपूर्ण रायगड त्या दिवशी नवरी सारखा सजवण्यात आला होता . महाराज केवळ शूर आणि युद्ध निपुणच नव्हे तर ते एक उत्तम प्रशासक देखील होते . धर्माच्या नावाखाली त्यांनी काहीही कुणासोबत पक्षपात केला नाही . त्यांच्या दरबारातील काही अधिकारी आणि अंगरक्षक मुस्लिम समुदायाचे होते . त्यांनी कधीही कुठल्याही स्त्रीचा अनादर केला नाही . शत्रूच्या स्त्रियांना देखील सन्मानपूर्वक परत पाठवत असत . ०६ जून १६७४ रोजी छत्रपतींचा राज्याभिषेक रायगडावर पार पडला . यावेळी ३२ मन वजनाचे सुवर्ण सिंहासन घडविण्यात आले होते ज्यावर राजे विराजमान झाले .

## राजमुद्रा

● छत्रपती शिवाजी महाराज जेव्हा पुण्याचा कारभार पाहत होते . तेव्हा त्यांना शहाजी राजांनी स्वतंत्र राजमुद्रा तयार करून दिली . ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती .

“प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ।।
शाहसूनो : शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ।।”

## शिवाजी महाराजांचा मृत्यू

● शिवाजी महाराजांचा मृत्यू ३ एप्रिल १६८० मध्ये त्यांची तब्येत खालावत गेली आणि रायगडावर त्यांनी अखेरचा श्वास घेतला . महाराणी पुतळाबाई या महाराजांच्या चितेवर सती गेल्या .

एक उत्तम शासक, एक उत्तम राजा, मराठा साम्राज्याचे संस्थापक, श्री छत्रपती शिवाजी महाराज कायम प्रत्येक भारतीयाच्या मनात आहेत . अशा या महान राजाला कोटी कोटी प्रणाम . . !



# सिंहासनाधिश्वर !




# शिवाजी महाराजांचा जगातील पहिला पुतळा कुठे ?

## छत्रपती शाहू महाराजांचा पुढाकार

● मात्र याच काळात महात्मा गांधीजींची असहकार चळवळ पुण्यासह संपूर्ण भारतात जोमात सुरु होती . अखेर बऱ्याच घडामोडींनंतर 19 नोव्हेंबर 1921 ला प्रिन्स एडवर्ड पुण्यात आला आणि शिवाजी महाराजांच्या प्रतिमेसमोर नतमस्तक झाला . प्रिन्स एडवर्डच्या या कार्यक्रमाला त्यावेळी पुण्यात विरोधही झाला . पण छत्रपती शाहू महाराजांनी मोठ्या समारंभपूर्वक या स्मारकाची पायाभरणी केली . ब्रिटिशांच्या युवराजच्या हस्ते या स्मारकाचं भूमिपूजन करवून शाहू महाराजांनी एक मोठा उद्देश साध्य केला होता .

इंग्रज शिवाजी महाराजांना राष्ट्रपुरुष मानायलाच तयार नव्हते . त्यांनी शिवाजी महाराजांची लुटारू ही प्रतिमा तयार केली होती . मात्र प्रिन्स ऑफ वेल्स इथे आला आणि त्याला छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल माहिती मिळाली तेव्हा त्यानं म्हटलं की शिवाजी महाराज नॉट ओन्ली बिल्ड एम्पायर बट ही बिल्ड द नेशन . .

● शिवरायांच्या स्मारकासाठी महाराष्ट्रातील प्रमुख राजकीय घराणी पुढं आली . पण त्यावेळची राजकीय आणि सामाजिक परिस्थितीच अशी होती की या स्मारकामध्ये अनेक अडथळे उभे ठाकले . 1917 ला या स्मारकाचा विचार सुरु झाला पण त्याच भूमिपूजन व्हायला 1921 चा नोव्हेंबर महिना उजाडावा लागला .

● जगभरामध्ये युरोपियन प्रदेशांमध्ये असे पुतळे उभे राहत होते . इथेही शिवाजी महाराजांचा असा पुतळा असावा असा संस्थानिकांमध्ये विचार सुरु झाला . त्यामध्ये राजर्षी शाहू महाराज, बडोद्याचे गायकवाड, इंदोरचे होळकर, दिवसाचे पवार आणि ग्वाल्हेरचे शिंदे यांनी इतर संस्थानिकांना बरोबर घेऊन शिवाजीनगरच्या भांबुर्ड्यात हे स्मारक उभा केलं .

**हातात** तलवार घेऊन घोड्यावर स्वार झालेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा आज महाराष्ट्रातील गावागावात पाहायला मिळतो . देशाच्या आणि जागाच्याही कानाकोपऱ्यात छत्रपती शिवाजी महाराजांची हीच प्रतिमा पुतळ्याच्या स्वरूपात साकारण्यात आलीय . शिवाजी महाराजांचे हे पुतळे ज्याच्यावर आधारलेले आहेत किंवा ज्या पुतळ्याला रोल मॉडेल मानून उभारण्यात आलेत तो शिवाजी महाराजांचा जगातील पहिला पुतळा कुठे उभारण्यात आला माहितेय ? छत्रपती शाहू महाराजांच्या पुढाकाराने शिवाजी महाराजांचा जगातील पहिला पुतळा उभारण्यात आला पुण्यातील ऑल इंडिया श्री शिवाजी मेमोरियल सोसायटीमध्ये . 1917 साली हा पुतळा उभारण्याचा निर्णय झाला आणि तब्बल अकरा वर्षांच्या मेहनतीनंतर अनेक संकटांना पार करत हा पुतळा प्रत्यक्षात साकार झाला . शिवजयंतीच्या निमित्तीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जगातील पहिल्या पुतळ्याच्या निर्मितीची कहाणी वाचकांसाठी . . . . .'

## अन् युवराज प्रिन्स एडवर्डने स्मारकाच्या भूमिपूजनाला यायचं आमंत्रण स्वीकारलं

इंग्रजांच्या सत्तेबरोबरच युरोपियन शिल्पकलाही विसाव्या शतकात भारतात दाखल झाली . कोलकाता, मुंबई , पुणे यासारख्या शहरांमध्ये काही शिल्पं आणि पुतळे उभेही राहिले होते . पण तोपर्यंत महाराष्ट्राची अस्मिता असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कुठेही नव्हता . त्यावेळच्या सामाजिक परिस्थितीमध्ये छत्रपती शाहू महाराजांना याची गरज वाटली . दुसरीकडे पहिल्या महायुद्धात इंग्रजांकडून लढणाऱ्या मराठी सैनिकांच्या पराक्रमाची गरज आणि ओळख इंग्रजांना नव्याने पटली होती . त्यामुळे इंग्रजांच्या युवराजाने पुतळ्याच्या भूमिपूजनाला यायचं मान्य केलं . ज्या इंग्रजांनी शिवाजी महाराजांचा चुकीचा इतिहास लिहिला होता त्याच इंग्रजांचा युवराज आता छत्रपती शिवाजी महाराजांपुढे नतमस्तक होणार होता .

छत्रपती शाहू महाराजांनी 1917 साली पुण्यात शिवाजी महाराजांचे भव्य स्मारक उभारण्याचा विचार मांडला . त्यावेळच्या इतर संस्थानिकांनी देखील ही कल्पना उचलून धरली . त्यावेळच्या इंग्रज सरकारने देखील याला पाठिंबा दिला . एवढंच नाही तर पहिल्या महायुद्धात मराठ्यांनी दाखवलेल्या पराक्रमाने प्रभावित झालेल्या इंग्रजांचा युवराज प्रिन्स एडवर्डने शिवाजी महाराजांच्या स्मारकाच्या भूमिपूजनाला यायचं आमंत्रण स्वीकारलं .

शिवाजी महाराजांचं स्मारक असावं अशी चर्चा त्याकाळी सुरु झाली . त्या काळात लोकमान्य टिळक कॉंग्रेसचं नेतृत्व करत होते तर शाहू महाराज ब्राम्हणेतर चळवळ चालवत होते . त्याच काळात पहिल्या महायुद्धात इंग्रजांना मराठ्यांची खूप मदत झाली . त्यामुळे शिवाजी महाराजचं महत्व इंग्रजांना मान्य करावं लागलं . त्यांना हे कळालं की लढणाऱ्या या लोकांची मूळ प्रेरणा ही आहे . त्यातून स्मारकाची ही कल्पना पुढे आली . अर्थात त्यामध्ये शाहू महाराज प्रमुख होते .

## राजाराम महाराजांकडून स्मारकासाठी दोन शिल्पकारांची निवड

स्मारकाची पायाभरणी झाली खरी पण त्यानंतर काहीच दिवसांमध्ये 6 मे 1922 ला छत्रपती शाहू महाराजांचं निधन झालं . शाहू महाराजांच्या निधनानंतर या स्मारकाची जबाबदारी ग्वाल्हेरच्या अलीबहाद्दर महादेवराव शिंदेंकडे आली . पण ज्या प्रकराचा भव्य – दिव्य पुतळा आणि सुंदर स्मारक उभारण्याचं शाहू महाराजांचं स्वप्न होतं तसा पुतळा तयार करणारी कंपनी भेटत नव्हती . कारण तोपर्यंत एवढा भव्य पुतळा तयारच करण्यात आला नव्हता . ही शोधाशोध सुरु असतानाच ग्वाल्हेरच्या अलिबहाद्दर माधवराव शिंदेंचं निधन झालं . त्यानंतर या स्मारकाची जबाबदारी कोल्हापूरचे तिसरे राजाराम महाराज यांच्यावर आली . राजाराम महाराजांनी स्मारकासाठी दोन शिल्पकारांची निवड केली . स्मारकातील शिल्प बनवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली नानासाहेब करमरकर यांच्याकडे तर पुतळा तयार करण्याची जबाबदारी सोपवण्यात आली राव बहाद्दर म्हात्रे यांच्याकडे .

या स्मारकासाठी करमरकरांनी चार सुंदर शिल्पं तयार केली . पुतळ्याच्या समोरच्या बाजूला संगमरवरामध्ये कोरलेलं भवानी देवी शिवाजी महाराजांना भवानी तलवार देते आहे हे शिल्प संगमरवरमध्ये कोरण्यात आला तर पुतळ्याच्या डाव्या बाजूला शिवाजी महाराजांनी वणी – दिंडोरी इथं दाऊदखानवर मिळवलेल्या विजयाचा प्रसंग चितारण्यात आला .तर पुतर पुतळ्याच्या पाठीमागे कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला शिवाजी महाराजांनी जी सन्मानाची वागणूक दिली तो प्रसंग ब्रॉन्झमध्ये कोरण्यात आला तर पुतळ्याच्या उजव्या बाजूला शिवराज्याभिषेकाचा प्रसंग ब्रॉन्झ मध्ये चितारण्यात आला . नानासाहेब करमरकरांनी त्यांना दिलेली या शिल्पांची जबाबदारी मुदतीआधी तीन महिनेच पूर्ण केली होती . पण मुख्य पुतळा बनवण्याची जबादारी ज्यांच्यावर होती त्या राव बहाद्दर म्हात्रे यांनी त्यांच्या कामाला अजून सुरुवातच केलेली नव्हती . त्यामुळं पुतळा बनवण्याचं कामही नानासाहेब करमरकर यांनाच देण्याचा निर्णय राजाराम महाराजांनी घेतला .

नानासाहेब करमरकरांनी हे आव्हान पेललं खरं पण तोपर्यंत इतका मोठा पुतळा भारतात कोणीच तयार केला नव्हता . करमरकरांनी त्यासाठी पुतळा बनवणाऱ्या अनेक कंपन्यांकडे विचारणा केली . पण कोणीच हे धाडस करायला तयार झालं नाही . अखेर नानासाहेब करमरकर जहाजे आणि युद्धनौका जिथं तयार 10 जूनला हा पुतळा पुण्यात पोहचला . पुणे स्टेशनपासून वाजत–गाजत या पुतळ्याची मिरवणूक काढण्यात आली . 16 जूनचा दिवस उजाडला . राजाराम महाराजांसोबत या पुतळ्याच्या अनावरणाला त्यावेळच्या मुंबई प्रांताचा गव्हर्नर लेस्ली विल्सन हजर होता . पुतळ्याच्या उभारणीवरून झालेले आधीचे सगळे वाद बाजूला ठेऊन सगळ्यांना पुतळ्याच्या अनावरणाच्या या कार्यक्रमात सामावून घेण्याय आलं . डोळ्यांचं पारणं फेडणारा सोहळा आयोजित करून शिवाजी महाराजांच्या जगातील पहिल्या पुतळ्याचं अनावरण करण्यात आलं .

काळाच्या ओघात शिल्पकलेचा विस्तार झाला आणि छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे एकामागोमाग एक तयार व्हायला लागले . पण शिल्पकलेच्या निकषांमध्ये आजही हा पहिला पुतळा अद्वितीय मानला जातो . कारण आपल्या देशात सिंगल कास्टिंग म्हणजे एकाच साच्यात तयार झालेल्या हाताच्या बोटावर मोजता येतील इतक्या मोजक्या पुतळ्यांमध्ये त्याचा समावेश होतो . आणि म्हणूनच या पुतळ्यातील छत्रपती शिवरायांचं रूप काही औरच दिसतं . त्यामुळे शिल्पकलेच्या विद्यार्थ्यांसाठी आजही हा पुतळा आदर्श मानला जातो . या पुतळ्यात एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात घोड्याचा लगाम पकडून स्वारीवर निघालेल्या छत्रपती शिवरायांची प्रतिमाच सर्वांच्या मानत इतकी घट्ट बसली की पुढे छत्रपती शिवाजी महाराजांचे पुतळे, शिल्पं आणि चित्रं याच रूपात आकाराला आली . हा पुतळा महाराष्ट्राच्या मानवार कळत – नकळतपणे असा परिणाम करणारा ठरलाय .

छत्रपती शिवाजी महाराज म्हटलं की आपल्यासमोर महाराजांची जी प्रतिमा उभी राहते ती या पुतळ्यातून आलीय . आपण ही प्रतिमा तर स्वीकारली पण त्यासोबत हा पुतळा उभा करण्यामागे छत्रपती शाहू महाराजांचा जो विचार होता तो आपण स्वीकारलाय का ? आज छत्रपती शिवरायांबरोबरच इतर महापुरुषांचे पुतळे गावोगावी उभे राहिलेत . हे पुतळे उभारताना त्यांच्यापाठीमागचा विचारही आपण घेतो आहोत का . हे महापुरुष पराक्रमाची जसे ओळखले जातात तसेच सर्वांना सोबत घेऊन जाण्यासाठीही ते ओळखले जातात .

हे पुतळे उभारण्यातून हे सामाजिक ऐक्य साधले जातंय का . आज सर्व पुतळ्यांचा आद्य पुतळा असलेला हा पुतळा आपल्या सगळ्यांना हा प्रश्न विचारतोय .
















LIVE महाराष्ट्र 24x7
'लाईव्ह महाराष्ट्र 24x7' हे पत्रक मुद्रक, प्रकाशक, मालक, संपादक सचिन सुखदेव अंभोरे यांनी हरिओम प्रिंटर्स, सिडको टाऊन हॉल, औरंगाबाद, ता.जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथे खाजगी वितरणासाठी छापून सचिन मल्टीमिडिया, द्वारिका कॉम्प्लेक्स, पी-२३, एन-१, सिडको टाऊन सेंटर येथे प्रकाशीत केले. ई-मेल. livemaharashtra247@gmail.com मो. 9970409640


आग्र्याच्या
रणांगणात
ऐतिहासिक
शिवजयंती
सोहळा
विनोद पाटील
अध्यक्ष - अजिंक्य देवगिरी प्रतिष्ठान
अध्यक्ष - आर.आर.पाटील फाउंडेशन महाराष्ट्र


छत्रपती
शिवाजी
महाराज
जयंती निमित्त
हार्दिक शुभेच्छा!
आपलाच
अभिजीत देशमुख
●माजी संचालक : औरंगाबाद जिल्हा
मध्यवर्ती सहकारी बँक, तथा नगरसेवक


शिवजयंती
अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत
छत्रपती शिवाजी महाराज
जयंती निमित्त
विनम्र अभिवादन
आपलाच
हर्षवर्धन भागवत कराड
●अध्यक्ष, छत्रपती संभाजीनगर जिल्हा शिवजयंती उत्सव समिती -२०२३